# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर


Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in


०२ एप्रिल, २०१९


☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)


## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक ०१/०४/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **बल्लारशाह, घुग्घुस, रामनगर, भद्रावती, ब्रम्हपुरी, चिमुर, पाथरी, कोरपना, गडचांदुर** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१०** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **०४** आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **२,७१,४००/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

———————————————————————————————————————

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

**१)पोलीस स्टेशन रामनगर :—**

दिनांक **०१/०४/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **रामनगर** अंतर्गत दवा बाजार जवळ ०१ आरोपी ईसम हा सटट्रापटट्रीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **रामनगर** येथे अप. क्र. **४२०/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **४६,९८०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **रामनगर** पोलीस करीत आहे.

———————————————————————————————————————

# रामनगर पोलीसांनी २४ तासात जबरी चोरी करणाऱ्या दोन आरोपींना केले जेरबंद

दिनांक ३१/०३/२०१९ रोजी पोलीस स्टेशन रामनगर परिसरात सुमारे ०८:०० वाजता दरम्यान फिर्यादी नामे क्रिष्णा मंगुर रा. जलनगर वार्ड, चंद्रपुर हे आणि त्यांचा मित्र लॉकॉलेज जवळ असतांना एका मोटारसायकलस्वार दोन इसमांनी त्यांना लॉकॉलेज जवळील वॉटर फिल्टर जवळ नेवुन मारहाण करून त्यांचे ताब्यातील १,५००/—रू रोख आणि एटीएम कार्ड जबरीने चोरून नेले. तर दुसरी कडे रात्रो १२:०० वाजता दरम्यान होटेल ट्रायस्टार जवळ फिर्यादी नामे अमोल पारखी (एमएसईबी लाईनमेन) रा. चंद्रपुर हे आपल्या कामावरून नातेवाईकासोबत मोटारसायकल ने परत येत असतांना वरील प्रमाणे वर्णनाच्या दोन इसमाने त्यांना थांबवुन त्यांच्या जवळील एमआय कंपनीचा मोबाईल, एटीएम कार्ड, राशन कार्ड आणि ३००/—रू रोख रक्कम चोरून नेली.

घडलेल्या दोन्ही वेगवेगळया घटनेतील फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन रामनगर येथे धाव घेवुन हकीकत सांगुन पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र. ४१७/२०१९ आणि ४१८/२०१९ कलम ३९२, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शनात रामनगर पोलीसांनी वेगवेगळया पद्धतीने तर्क लावुन गुन्हा करणाऱ्या आरोपीतांचा शोध घेण्यास सुरवात केली. तपासादरम्यान दिनांक ०१/०४/२०१९ रोजी गोपनीय माहिती वरून जनता कॉलेज परिसरातुन दोन संशयीत इसमास दुचाकीसह ताब्यात घेण्यात आले. दोन्ही इसमास विचारपुस केली असता सदरचा गुन्हा त्यांनीच केल्याची कबुली दिली आणि त्यांचे ताब्यात त्यांनी चोरी केलेला मुद्देमाल मिळुन आला. दोन्ही आरोपी नामे १) शुभम जाट वय २४ वर्ष, २) अनुराध दर्शन वय २४ वर्ष दोन्ही रा. चंद्रपुर यांना अटक करण्यात आली असुन पुढिल तपास रामनगर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक रामनगर श्री. प्रकाश हाके यांचे नेतृत्वात पोउपनि वाघमारे, सफौ. जाधव, पोना. चिकाटे, किशोर वैरागडे, पोशि राकेश निमगडे यांनी पार पाडली.

———————————————————————————————————